# विषय गेले पठ्ठून

## लेखक परिचय

संजय आत्माराम पवार (जन्म १९५७)

मराठीतील एक आघाडीचे नाटककार. 'मी सिंधुताई सपकाळ' या चित्रपटासाठी पटकथेचा राष्ट्रीय पुरस्कार त्यांना प्राप्त झाला आहे. अलीकडच्या काळातील सामाजिक व सांस्कृतिक चलनवलनाचा वेध घेणारे, ढोंगी वृत्तीचा समाचार घेणारे जहाल लेखन, कसदार भाषा व उपरोधिक शैली हे त्यांच्या लेखनाचे विशेष आहेत.

## लेखकाचे साहित्यलेखन

**नाटक** – 'दोन अंकी नाटक', 'कोण म्हणतं टक्का दिला?'

**एकांकिका** – 'पांडुरंग', 'शापित नात्यांच्या वाटेवर'.

**लेखसंग्रह** – 'चोख्याच्या पायरीवरून'.

**चित्रपट-पटकथा लेखन** – 'मी सिंधुताई सपकाळ' इ.

## पाठाचा आशय

'विषय गेले पळून' हा संजय पवार लिखित पाठ म्हणजे एक एकांकिका आहे. या एकांकिकेत शाळेच्या अभ्यासक्रमातले काही विषय फरार झाले आहेत. काही सापडले असले, तरी इतिहास, भूगोल आणि नागरिकशास्त्र हे विषय मात्र पोलिसांच्या हाती लागलेले नाहीत. हे विषय माणसाने उलट्या फिरवलेल्या नियतीच्या चक्रामुळे नाखूश आहेत. डोंगर पोखरून, झाडे तोडून माणसाने भूगोलच बदलायला सुरुवात केली आहे. त्यांना या माणसांच्या जगात राहायचेच नाही. हे विषय ज्या ठिकाणी लपलेत त्या ठिकाणी शाळेला कंटाळलेला मुलगाही येऊन पोहोचला आहे. शाळेतल्या शिकण्यात तोचतोपणा असून त्यात नावीन्य नाही अशी त्याची तक्रार आहे. त्याला निसर्गाशी, बाहेरच्या जगाशी, जीवनाशी नाते सांगणारे शिक्षण हवे आहे. त्याच्या स्वप्नातले जीवन ऐकून इतिहास, भूगोल, नागरिकशास्त्रालाही त्या जीवनाचा हिस्सा व्हावेसे वाटते.

## शब्दार्थ

| | |
|---|---|
| **अकाली** | वेळेपूर्वी |
| **गज** | लोखंडी सळई |
| **गुलवणे** | गोंधळवणे, फसवणे |
| **गौरवशाली** | गौरवास्पद |
| **छाताड** | छाती |
| **देदीप्यमान** | अत्यंत तेजस्वी |

| | |
|---|---|
| **पाईक** | दास, सेवेकरी |
| **प्रदूषित** | दूषित झालेले |
| **फरार** | पळून गेलेला |
| **बुजुर्ग** | मोठी, वयस्कर मंडळी |
| **रणांगण** | रणभूमी |
| **विद्वेष** | तिरस्कार |
| **शीळ** | शिटी |

## इंग्रजी शब्दांचे मराठी अर्थ

| | | |
|---|---|---|
| १. | **कंपोझिशन्स** (Composition) | संगीतरचना. |
| २. | **नो मॅन्स लँड** (No man's land) | माणसांची वस्ती व वावर नसलेले ठिकाण. |
| ३. | **बुलेट** (Bullet) | बंदुकीची गोळी. |
| ४. | **बेड** (Bed) | पलंग. |
| ५. | **मशिनगन्स** (Machineguns) | चाप ओढताच गोळ्यांच्या सतत फैरी झाडणारी बंदूक. |
| ६. | **मार्केट** (Market) | बाजार. |
| ७. | **रिबॉण्ड** (Rebound) | आपटून मागे येणे, उलटणे. |
| ८. | **लेटेस्ट** (Latest) | अलीकडची. |
| ९. | **वॉर** (War) | युद्ध. |
| १०. | **व्हिडिओ** (Video) | चित्रफीत |
| ११. | **सायकिॲट्रिस्ट** (Psychiatrist) | मानसोपचारतज्ज्ञ |
| १२. | **सिव्हिलियन्स** (Civilians) | नागरिक. |

## इंग्रजी वाक्याचा मराठी अनुवाद

| | | |
|---|---|---|
| १. | **लेट अस आस्क देम.** | चला त्यांना विचारूया. |

## वाक्प्रचार व त्यांचे अर्थ

| | | |
|---|---|---|
| १. | चक्रे उलटसुलट करणे | नेहमीची पद्धत बिघडवणे. |
| २. | जीवावर उठणे | ठार मारू पाहणे, नाश करू पाहणे. |
| ३. | तोंड वर करून बोलणे | उद्धटपणे बोलणे, उद्दामपणे बोलणे. |
| ४. | पाईक होणे | सेवकत्व स्वीकारणे. |
| ५. | फरार होणे | पळून जाणे. |
| ६. | भूक वाढणे | हाव वाढणे. |
| ७. | हिंग लावून विचारणे | महत्त्वाच्या गोष्टींमध्ये मान देणे, सल्ला विचारणे. |

## स्वाध्याय

### परिच्छेद १


पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. ४९ वरील (ओळ १ ते ११) वाचा व खालील प्रश्नांची उत्तरे द्या.

|पडता उघडतो ......................

...................... एके ठिकाणी थांबतात.|


अ. आकलन

कृ.१. आकृतिबंध पूर्ण करा.





उत्तर: १. इतिहास २. भूगोल
३. नागरिकशास्त्र

कृ.२. ओघतक्ता पूर्ण करा.




उत्तर: १. रंगमंच पूर्ण काळोखात
२. सायरनचे आवाज
३. रंगमंचावर निळसर प्रकाश
४. दूरदर्शन निवेदिकेचे आगमन

कृ.३. शब्दजाल पूर्ण करा.




उत्तर: १. रोमन राजासारखी राजवस्त्रं

२. सदऱ्यावर नकाशे

३. पट्ट्यांचा / चौकटींचा शर्ट

**कृ.४. चौकट पूर्ण करा.**

१. **वेळापत्रकातले विषय असे पळाले** → ☐

२. **शासन व पोलिसांना यामध्ये यश मिळेल असे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले.** → ☐

**उत्तर:** १. वेळापत्रकाचे गज वाकवून पळाले.

२. सर्व विषय वेळापत्रकात परत आणण्यात.

**कृ.५. योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. निवेदिका - सर्व नागरिकांसाठी ________

अ. एक विनंती ब. एक आवाहन

क. एक सूचना ड. एक बातमी

२. पोलिसांनी संपूर्ण शहराची ________

अ. तपासणी केली आहे.

ब. चौकशी केली आहे.

क. नाकेबंदी केली आहे.

ड. झडती घेतली आहे.

**उत्तर:** १. निवेदिका - सर्व नागरिकांसाठी **एक आवाहन.**

२. पोलिसांनी संपूर्ण शहराची **नाकेबंदी केली आहे.**

**कृ.६. विधाने सत्य की असत्य ते ओळखा.**

१. रंगमंचावरील निळसर प्रकाशात वृत्तनिवेदिका बातमी निवेदन करत आहे.

२. भाषेच्या विषयांना पोलिसांनी २४ तासांच्या आत अटक केली आहे.

३. सतत पाठलाग करूनही पीटीचा तास पोलिसांच्या हाती लागला नाही.

४. इतिहास, भूगोल व नागरिकशास्त्र या विषयांचा तपास जारी आहे.

**उत्तर:** १. सत्य        २. सत्य
३. असत्य        ४. सत्य

**कृ.७. प्रश्न तयार करा.**

१. 'विषय' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

२. 'पीटी' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

**उत्तर:** १. शाळेतून कोण फरार झाले?
२. कोणता तास पोलिसांच्या हाती लागला?

## ब. माझा अभ्यास - शब्दसंपत्ती

**कृ.१. सहसंबंधानुसार रिकाम्या जागा भरा.**

१. काळोख : अंधार : : लांब : [ ]

२. स्वच्छ : [ ] : : यशस्वी : अयशस्वी

**उत्तर:** १. दूर        २. अस्वच्छ

**कृ.२. शब्दसमूहाबद्दल एक शब्द द्या.**

निवेदन करणारी : [ ]

**उत्तर:** निवेदिका

**कृ.३ गटात न बसणारा शब्द ओळखा.**

१. इतिहास, पीटी, भूगोल, नागरिकशास्त्र

२. शासन, मुख्यमंत्री, निवेदिका, पोलीस

**उत्तर:** १ पीटी २. निवेदिका

**कृ.४. खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.**

१. **फरार होणे** : पळून जाणे.

**वाक्य:** पोलिसांच्या हातावर तुरी देऊन अट्टल चोर **फरार झाले.**

२. **हाती येणे** : गवसणे, सापडणे.

**वाक्य:** परिश्रम केल्यास यश निश्चित **हाती येते.**

**कृ.५. दोन शब्दांतील रिकाम्या जागी एक शब्द भरून दोन अर्थपूर्ण शब्द तयार करा.**

१. नागरिक [ ] अभ्यास

२. मुख्य [ ] मंडळ

३. राज [ ] दान

**उत्तर:** १. नागरिकशास्त्र, शास्त्राभ्यास

२. मुख्यमंत्री, ,मंत्रीमंडळ

३. राजवस्त्र, वस्त्रदान

**कृ.६. पुढील अपूर्ण वाक्य विविध प्रकारे योग्य शब्दयोजनेने पूर्ण करा.**

शाळा गायब झाली, तर ______ .

**उत्तर:** १. शाळा गायब झाली, तर **विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर दुष्परिणाम होईल.**

२. शाळा गायब झाली, **तर मुलांना सुट्टी मिळेल.**

## क. माझा अभ्यास - व्याकरण

**कृ.१. खालील वाक्यातील नाम, सर्वनाम, विशेषण व क्रियापद ओळखून त्यांचे योग्य वर्गीकरण करा.**

पडदा उघडतो तेव्हा रंगमंच पूर्ण काळोखात.

**उत्तर:**

| नाम | सर्वनाम | विशेषण | क्रियापद |
|---|---|---|---|
| पडदा, रंगमंच, काळोख | - | पूर्ण | उघडतो |

**कृ.२. खालील शब्दांचे सामान्यरूप, विभक्ती प्रत्यय आणि विभक्ती ओळखून कोष्टक पूर्ण करा.**

| | शब्द | सामान्यरूप | विभक्ती प्रत्यय | विभक्ती |
|---|---|---|---|---|
| १. | सायरनचे | | | |
| २. | महानिरीक्षकांनी | | | |
| ३. | वेळापत्रकात | | | |

**उत्तर:**

| | शब्द | सामान्यरूप | विभक्ती प्रत्यय | विभक्ती |
|---|---|---|---|---|
| १. | सायरनचे | सायरन | चे | षष्ठी |
| २. | महानिरीक्षकांनी | महानिरीक्षकां | नी | तृतीया |
| ३. | वेळापत्रकात | वेळापत्रका | त | सप्तमी |

**कृ.३. वाक्यातील अधोरेखित अव्ययांचा प्रकार लिहा.**

१. मात्र इतिहास, भूगोल व नागरिकशास्त्र या विषयांचा अद्याप तपास लागला नसून, पोलिसांनी संपूर्ण शहराची नाकेबंदी केली आहे.

**उत्तर:** व - उभयान्वयी अव्यय

अद्याप - क्रियाविशेषण अव्यय

२. भूगोलाच्या सदऱ्यावर सर्वत्र नकाशे आहेत, तर नागरिकशास्त्राच्या अंगावर पट्ट्यांचा अथवा चौकटींचा शर्ट.

**उत्तर:** सर्वत्र - क्रियाविशेषण अव्यय

अंगावर - शब्दयोगी अव्यय

अथवा, तर - उभयान्वयी अव्यय

**कृ.४. खालील सामासिक शब्दांचा विग्रह करून समास ओळखा.**

१. मध्यभाग २. मुख्यमंत्री

३. महानिरीक्षक

**उत्तर:**

| | सामासिक शब्द | विग्रह | समास |
|---|---|---|---|
| १. | मध्यभाग | मध्य असा भाग | कर्मधारय समास |
| २. | मुख्यमंत्री | मुख्य असा मंत्री | कर्मधारय समास |
| ३. | महानिरीक्षक | महान असा निरीक्षक | कर्मधारय समास |

**कृ.५. कंसातील सूचनेप्रमाणे खालील वाक्यांचे रूपांतर करा.**

१. पडदा उघडतो तेव्हा रंगमंच पूर्ण काळोखात.

**(नकारार्थी करा.)**

**उत्तर:** पडदा उघडतो तेव्हा रंगमंचावर अजिबात उजेड नसतो.

२. हेच ते इतिहास, भूगोल व नागरिकशास्त्र.

**(प्रश्नार्थी करा.)**

**उत्तर:** हेच नाहीत का ते इतिहास, भूगोल व नागरिकशास्त्र?

**कृ.६. खालील शब्दांचे लिंग बदला.**

१. निवेदिका २. राजा

**उत्तर:** १. निवेदक २. राणी

**कृ.७. खालील वाक्ये लेखननियमांनुसार लिहा.**

१. पडदा उघडतो तेव्हा रंगमच पुर्ण काळोखात.

**उत्तर:** पडदा उघडतो त्रेव्हा **रंगमंच पूर्ण** काळोखात.

२. विषेश नीवेदन संपले.

**उत्तर:** **विशेष निवेदन** संपले.

**क्र.८. योग्य ठिकाणी विरामचिन्हे घालून वाक्ये पुन्हा लिहा.**

१. निवेदिका सर्व नागरिकांसाठी एक आवाहन

**उत्तर:** निवेदिका-सर्व नागरिकांसाठी एक आवाहन.

२. हेच ते इतिहास भूगोल व नागरिकशास्त्र

**उत्तर:** हेच ते इतिहास, भूगोल व नागरिकशास्त्र.

## ड. माझे मत

**क्र.१. 'निवेदन' हे एक व्यवसाय क्षेत्र किंवा 'करिअर क्षेत्र' होऊ शकते का? एका निवेदकाकडे कोणते गुण असणे आवश्यक असते असे तुम्हाला वाटते?**

**उत्तर:** आज उपलब्ध असणाऱ्या अनेक व्यावसायिक वाटांपैकी एक म्हणून निवेदनाकडे पाहिले जाऊ शकते. दूरदर्शन वाहिन्यांमधील वाढत्या स्पर्धेमुळे वृत्तनिवेदकांची गरज वाढू लागली आहे. त्यातही बातम्या सांगणारे, मनोरंजन क्षेत्राची माहिती देणारे, खेळांची माहिती देणारे, वादविवादात्मक कार्यक्रम हाताळणारे असे निवेदकांचे अनेक प्रकार आहेत. विविध कार्यक्रमांकरिता देखील निवेदकांची आवश्यकता असते. रेडिओवरील कार्यक्रमही निवेदक सादर करतात.

एक उत्कृष्ट निवेदक होण्यासाठी प्रथमतः तुमचे भाषेवर प्रभुत्व हवे. उच्चार स्पष्ट व सुंदर हवेत. तुमचे अवांतर वाचन चांगले हवे. आवाज स्पष्ट व खणखणीत असावा. तुमचे व्यक्तिमत्त्व चांगले हवे. ज्या विषयाचे निवेदन करायचे त्या विषयाचा अभ्यास हवा. प्रसंगावधान, आवाजातील योग्य चढउतार, हजरजबाबीपणा इत्यादी गुण असल्यास 'निवेदन' एक व्यवसाय क्षेत्र किंवा 'करिअर श्रेत्र' होऊ शकते.

## परिच्छेद २

पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. ५० वरील (ओळ १२ ते ३०) वाचा व खालील प्रश्नांची उत्तरे द्या.

[बस्स! आता जरा ......................

...................... बदलायचाय आणि भूगोलही]

अ. आकलन


कृ.१. आकृतिबंध पूर्ण करा.

इतिहासाने स्वत:चे केलेले वर्णन

१ २


उत्तर: १. देदीप्यमान २. गौरवशाली

कृ.२. आकृतिबंध पूर्ण करा.




उत्तर: १. अक्षांश २. रेखांश


कृ.३. आकृतिबंध पूर्ण करा.




उत्तर: १. माघार घ्यायची नाही.

२. आपण नवीन प्रदेश तयार करू.

कृ.४. चौकट पूर्ण करा.




उत्तर: १. लढाऊ २. 'यू सिव्हिलियन्स'

## कृ.५. योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.

१. बस्स! आता ______ !

अ. काहीतरी करूया ब. जरा थांबूया

क. थोडंसं चालूया क. थोडं थांबूया

२. मीही कुठलाही शास्त्र नसलेला एक ______

अ. फरार नागरिक ठरलोय.

ब. फरार चोर ठरलोय.

क. साधा विषय ठरलोय.

ड. माणूस ठरलोय.

**उत्तर:** १. बस्स! आता **जरा थांबूया!**

२. मीही कुठलाही शास्त्र नसलेला **एक फरार नागरिक ठरलोय.**

## कृ.६. विधाने सत्य की असत्य ते ओळखा.

१. इतिहास स्वत:चे वर्णन 'पराक्रमी संस्कारक्षम' असे करतो.

२. भूगोलाला सर्वच प्रदेश असाध्य वाटतात.

३. इतिहास नागरिकशास्त्राला 'यू सिव्हिलियन्स!' असे संबोधतो.

४. नागरिकशास्त्राचा पाया वापरून इतिहास व भूगोल घडत जातात.

**उत्तर:** १. असत्य २. असत्य

३. सत्य ४. असत्य

**कृ.७. प्रश्न तयार करा.**

१. 'मनुष्यवस्ती' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

२. 'लढाऊ' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

**उत्तर:** १. इथून काय फार जवळ नाही?

२. इतिहासाच्या मते तो कशा वृत्तीचा आहे?

## ब. माझा अभ्यास - शब्दसंपत्ती

**कृ.१. खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.**

१. जवळ × [ ] २. नवा × [ ]

**उत्तर:** १. लांब २. जुना

**कृ.२. खालील शब्दसमूह व शब्दांच्या योग्य जोड्या जुळवा.**

| | शब्दसमूह | | शब्द |
|---|---|---|---|
| १. | अत्यंत गौरवास्पद | अ. | फरार |
| २. | अत्यंत तेजस्वी असे | ब. | गौरवशाली |
| ३. | पळून गेलेला | क. | देदीप्यमान |

**उत्तर:** (१ - ब), (२ - क), (३ - अ)

**कृ.३. गटात न बसणारा शब्द ओळखा.**

१. देदीप्यमान, गौरवशाली, अक्षांश, लढाऊ

२. मनुष्य, शास्त्र, नागरिक, चोर

**उत्तर:** १. अक्षांश २. शास्त्र

कृ.४. खाली दिलेल्या शब्दापासून दोन अर्थपूर्ण शब्दांची रचना करा.

१. मनुष्य : [ ] [ ]

२. गौरव : [ ] [ ]

उत्तर: १. मनुष्यवस्ती, मनुष्यप्राणी

२. गौरवशाली, गौरवास्पद

## क. माझा अभ्यास - व्याकरण

कृ.१. खाली काही विशेषणे व विशेष्यांची सरमिसळ झाली आहे. परिच्छेदाच्या आधारे विशेषणे व विशेष्ये यांच्या योग्य जोड्या जुळवा.

| | | |
|---|---|---|
| इतिहास | नवा | वृत्ती |
| प्रदेश | लढाऊ | गौरवशाली |

उत्तर: १. गौरवशाली इतिहास

२. लढाऊ वृत्ती

३. नवा प्रदेश

कृ.२. खालील शब्दांचे विभक्ती प्रत्यय व विभक्ती देऊन कोष्टक पूर्ण करा.

| | शब्द | विभक्ती प्रत्यय | विभक्ती |
|---|---|---|---|
| १. | नकाशात | | |
| २. | वृत्तीच्या | | |
| ३. | तुम्हाला | | |

उत्तर:

| | शब्द | विभक्ती प्रत्यय | विभक्ती |
|---|---|---|---|
| १. | नकाशात | त | सप्तमी |
| २. | वृत्तीच्या | च्या | षष्ठी |
| ३. | तुम्हाला | ला | द्वितीया / चतुर्थी |

कृ.३. खालील वाक्यातील अधोरेखित अव्ययांचा प्रकार ओळखा.

१. बस्स! आता जरा थांबूया!

**उत्तर:** बस्स - केवलप्रयोगी अव्यय

२. हो, काहीच हरकत नाही.

**उत्तर:** काहीच - क्रियाविशेषण अव्यय

**कृ.५. कंसातील पर्यायांमधून वाक्याचा प्रकार ओळखा.**
**(प्रश्नार्थी, विधानार्थी, नकारार्थी)**

१. आपण नवाच प्रदेश तयार करू.

**उत्तर:** विधानार्थी

२. माघार तर निश्चित नाही.

**उत्तर:** नकारार्थी

३. पण माझं काय?

**उत्तर:** प्रश्नार्थी

**कृ.६. लेखननियमांनुसार अचूक शब्द ओळखा.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | दैधिप्यमान | देदीप्यमान | देदिप्यमान | देदीप्यमान |
| २. | व्रुत्ती | वृत्ति | वृत्ती | वृत्ती |

**उत्तर:** १. देदीप्यमान  २. वृत्ती

**कृ.७. खालील वाक्यांतील विरामचिन्हे ओळखा.**

१. बस्स! आता जरा थांबूया!

**उत्तर:** (!) - उद्गारवाचक चिन्ह

२. हो, काहीच हरकत नाही.

**उत्तर:** (,) - स्वल्पविराम

(.) - पूर्णविराम

## ड. माझे मत

**क्र.१. तुमचा आवडता विषय कोणता? तो तुम्हाला का आवडतो?**

**उत्तर:** शालेय अभ्यासक्रमात आपण अनेक विषय शिकत असतो. मराठी, इंग्रजी, गणित, विज्ञान, समाजशास्त्र इत्यादी; पण या सगळ्यांमध्ये माझा आवडता विषय आहे तो म्हणजे मराठी. याचे सगळ्यांत महत्त्वाचे कारण म्हणजे; ती माझी मातृभाषा आहे. त्यामुळे ती मला फार जवळची वाटते. आपल्या मराठी भाषेला समृद्ध परंपरा आहे. मराठीत मोठेमोठे कवी, लेखक, नाटककार होऊन गेले, ज्यांनी आपल्या मराठी भाषेचा झेंडा अटकेपार फडकवलाय. मराठी भाषेची ग्रंथसंपदा विपुल आहे. वाङ्मयापासून ते विश्वकोशापर्यंत शेकडो प्रकारची पुस्तके मराठीत उपलब्ध आहेत. संत ज्ञानेश्वरांपासून कवी कुसुमाग्रजांपर्यंत, विंदा करंदीकर, पु.ल.देशपांडे यांपासून जी.ए. कुलकर्णी यांसारख्या अनेक लेखक, कवींनी या भाषेला समृद्ध केले आहे. आमचे शालेय पाठ्यपुस्तकही नानाविध साहित्यप्रकारांनी भरलेली आहे. त्याचा अभ्यास करणे मला फार आवडते. महाराष्ट्रातील प्रत्येक माणसाला मराठीचा अभिमान वाटतो. मलाही म्हणावेसे वाटते, की 'लाभले आम्हांस भाग्य बोलतो मराठी.'

## परिच्छेद ३


पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. ५० वरील (ओळ ३० ते ४८) वाचा व खालील प्रश्नांची उत्तरे द्या.

[पार्श्वभूमीवर ......................

...................... व्हायला तयारच नाही.]

अ. आकलन

कृ.१. आकृतिबंध पूर्ण करा.




उत्तर: १. उठण्याची
२. पाणी भरण्याची
३. दळण्याची
४. शेतावर जाण्याची

**कृ.२. शब्दजाल पूर्ण करा.**




उत्तर: १. डोंगर
२. दऱ्या
३. नदी
४. नाले
५. ऊन
६. पाऊस

**कृ.३. ओघतक्ता पूर्ण करा.**




उत्तर: १. त्याने निसर्गाची चक्र उलटसुलट करून टाकली.

२. तो ऋतू बदलू लागला.

३. डोंगर पोखरू लागला.

४. झाडं तोडू लागला.

**क्र.४. आकृतिबंध पूर्ण करा.**




| | | | |
|---|---|---|---|
| उत्तर: १. | जाती | २. | धर्म |
| ३. | वंश | ४. | राष्ट्र |

**क्र.५. चौकट पूर्ण करा.**

१. **अशा स्पर्धेत माणूस राक्षस होत गेलाय** → ☐

२. **नागरिकशास्त्राला शाळेत असणारे मार्क** → ☐

उत्तर: १. चुटकी वाजवताच स्वर्गही तयार

२. १० मार्क

**कृ.६. योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. पार्श्वभूमीवर 'घनश्याम सुंदरा' ही ______

अ. भैरवी सुरू होते.

ब. भूपाळी सुरू होते.

क. आरती सुरू होते.

ड. कविता सुरू होते.

२. जो स्वत:बरोबर चराचर सृष्टीलाही ______

अ. आपल्यासोबत घेऊन चाललाय.

ब. बदलाकडे घेऊन चाललाय.

क. नाशाकडे घेऊन चाललाय.

ड. विनाशाकडे घेऊन चाललाय.

**उत्तर:** १. पार्श्वभूमीवर 'घनश्याम सुंदरा' ही **भूपाळी सुरू होते.**

२. जो स्वत: बरोबर चराचर सृष्टीलाही **विनाशाकडे घेऊन चाललाय.**

**कृ.७. विधाने सत्य की असत्य ते ओळखा.**

१. नाटकात पार्श्वभूमीवर 'घनश्याम सुंदरा...' ही भूपाळी वापरली गेली आहे.

२. माणूस स्वत:सह सर्व सृष्टीलाही नष्ट करण्याच्या मार्गावर निघाला आहे.

३. नागरिकशास्त्राच्या मते, माणूस प्रामाणिक होण्यासाठी तयारच आहे.

४. माणसाच्या वाढत्या गरजांमुळे निसर्गचक्र बिघडले आहे.

**उत्तर:** १. सत्य २. सत्य

३. प्रामाणिक × [ ]

**उत्तर:** १. कृत्रिम २. विद्वेष

३. अप्रामाणिक

**कृ.३. गटात न बसणारा शब्द ओळखा.**

१. डोंगर, दऱ्या, धर्म, ऊन

२. जात, पाऊस, वंश, धर्म


**उत्तर:** १. धर्म २. पाऊस

**कृ.४. वाक्प्रचार व त्यांच्या अर्थांच्या योग्य जोड्या जुळवा.**

| | वाक्प्रचार | | अर्थ |
|---|---|---|---|
| १. | चक्रे उलटसुलट करणे | अ. | हाव वाढणे |
| २. | भूक वाढणे | ब. | महत्त्वाच्या गोष्टींमध्ये मान देणे |
| ३. | जीवावर उठणे | क. | नेहमीची पद्धत बिघडणे |
| ४. | हिंग लावून विचारणे | ड. | नाश करू पाहणे |

**उत्तर:** (१ - क), (२ - अ), (३ - ड), (४ - ब)

कृ.५. खालील शब्दातील अक्षरांपासून अर्थपूर्ण शब्दांची रचना करा.




**उत्तर:** नाग, नागरिक, शास्त्र, नाक

## क. माझा अभ्यास - व्याकरण

**कृ.१. खालील शब्द आणि विभक्ती यांच्या जोड्या जुळवा.**

| | शब्द | | विभक्ती |
|---|---|---|---|
| १. | माणसाची | अ. | द्वितीया |
| २. | मार्काला | ब. | तृतीया |
| ३. | त्याने | क. | षष्ठी |

**उत्तर:** (१ - क), (२ - अ), (३ - ब)

**कृ.२. खालील अव्ययांचा वाक्यात उपयोग करा.**

१. ...वर     २. म्हणून

**उत्तर:** १. माणसाने चंद्रा**वर** जाण्याचे स्वप्नही पूर्ण केले.

२. माणसाला बुद्धीचे वरदान आहे; **म्हणून** तो इतकी प्रगती करू शकला.

**कृ.३. खालील सामासिक शब्दाचा विग्रह करून समास ओळखा.**

घनश्याम

**उत्तर:**

| सामासिक शब्द | विग्रह | समास |
|---|---|---|
| घनश्याम | **घनासारखा श्याम** | **कर्मधारय समास** |

**कृ.४. कंसातील सूचनेप्रमाणे खालील वाक्यांचे रूपांतर करा.**

१. छान दृश्य होते. **(नकारार्थी करा.)**

**उत्तर:** वाईट दृश्य नव्हते.

२. मी काय करणार? **(विधानार्थी करा.)**

**उत्तर:** मी काही करू शकत नाही.

३. तू नागरिकशास्त्र ना! **(प्रश्नार्थी करा.)**

**उत्तर:** तू नागरिकशास्त्र नाहीस का?

**कृ.५. खालील वाक्यांतील अधोरेखित शब्दांचे वचन बदलून वाक्ये पुन्हा लिहा.**

१. किती छान दृश्य होतं.

**उत्तर:** किती छान **दृश्ये होती**.

२. शाळेतलं शेंबडं पोरही विचारत नाही.

**उत्तर:** **शाळेतली शेंबडी पोरंही** विचारत **नाहीत**.

**कृ.६. खालील शब्द लेखननियमांनुसार लिहा.**

१. पाश्वभूमी २. श्वासोश्वास

३. विद्वेश ४. स्रुष्टी

**उत्तर:** १. पार्श्वभूमी २. श्वासोच्छ्वास

३. विद्वेष ४. सृष्टी

**कृ.७. चुकीची विरामचिन्हे बदलून वाक्ये पुन्हा लिहा.**

१. पार्श्वभूमीवर, घनश्याम सुंदरा, ही भूपाळी सुरू होते.

**उत्तर:** पार्श्वभूमीवर 'घनश्याम सुंदरा' ही भूपाळी सुरू होते.

२. सांग. सांग याला 'माणूस' म्हणायचा!

**उत्तर:** सांग, सांग याला 'माणूस' म्हणायचा?

**ड. माझे मत**

**कृ.१. 'माणसाच्या कृतींचा निसर्गावर होणारा परिणाम' यावर तुमचे मत सांगा.**

**उत्तर:** माणसाच्या हलगर्जी स्वभावामुळे, त्याच्या स्वार्थापायी सध्या निसर्गाचा समतोल ढासळताना दिसतो आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे अन्न-वस्त्र-निवारा या मूलभूत गरजांची पूर्तता करण्यासाठी निसर्गातील झाडांची, जंगलांची तोड होते; पण त्या जागी नवीन झाडे लावली जात नाहीत. सिमेंट कॉंक्रीटची जंगले वाढत आहेत. नदीनाल्यांमध्ये कारखान्यातील सांडपाणी सोडून, कचरा टाकून ते दूषित केले जात आहेत. वाढत्या प्रदूषणामुळे रोगराईचे प्रमाण वाढत आहे. जंगलतोडीमुळे वाढती उष्णता, पावसाचे कमी होणारे प्रमाण, पिण्याच्या पाण्याची कमतरता या समस्याही गंभीर होत आहेत.

या साऱ्या निसर्गाच्या ढासळत्या समतोलावर वेळीच उपाययोजना केल्यास परिस्थिती निश्चितच सुधारू शकते. आजची तरुण पिढी यात काही अंशी पुढाकार घेताना दिसते आहे. झाडे लावा, झाडे जगवा; पाणी वाचवा; प्रदूषण टाळा; स्वच्छ भारत अशा अनेक मोहिमांमधून जनजागृती घडताना दिसत आहे. जगातील प्रत्येक नागरिकाने मनापासून प्रयत्न केल्यास सध्याची निसर्गाची ढासळती स्थिती निश्चितच सुधारेल यात शंका नाही.

## परिच्छेद ४


**पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. ५१ वरील (ओळ ४९ ते ८१) वाचा व खालील प्रश्नांची उत्तरे द्या.**

**[अरे.. तो पहा ......................**

**...................... कुणालाही न सांगता? हो.]**

अ. आकलन

कृ.१. आकृतिबंध पूर्ण करा.




**उत्तर:** १. याला भुलवला पाहिजे.

२. गुलवला तरी पाहिजे.

३. नाहीतर हाकलला तरी पाहिज़े.

**कृ.२. आकृतिबंध पूर्ण करा.**





**उत्तर:** १. कोण आहेस तू? २. कुठून आलास?

३. इथे काय करतोस?

**कृ.३. चौकट पूर्ण करा.**

१.
२.




**उत्तर:** १. 'नो मॅन्स लॅण्ड' पाहणे.

२. नवं काहीच शिकायला मिळत नसल्यामुळे.

## कृ.४. योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.

१. तिथे मला नवं काहीच ______

अ. करायला मिळत नव्हतं.

ब. शिकायला मिळत नव्हतं.

क. बघायला मिळत नव्हतं.

ड. खेळायला मिळत नव्हतं.

२. तुम्हाला शोधून काढायला ______

अ. हजारोंचं बक्षीस जाहीर झालंय.

ब. लाखांचं बक्षीस जाहीर झालंय.

क. मोठं बक्षीस जाहीर झालंय.

ड. सुवर्णपदक जाहीर झालंय.

उत्तर: १. तिथे मला नवं काहीच **शिकायला मिळत नव्हतं.**

२. तुम्हांला शोधून काढायला **लाखांचं बक्षीस जाहीर झालंय.**

## कृ.५. विधाने सत्य की असत्य ते ओळखा.

१. इतिहास, भूगोल व नागरिकशास्त्र हे 'नो मॅन्स लॅण्ड'वर पळून आले आहेत.

२. शाळकरी मुलगा फरार विषयांना शोधून बक्षीस जिंकण्यासाठी 'नो मॅन्स लॅण्ड'वर आला आहे.

३. इतिहास, भूगोल व नागरिकशास्त्र विषयांना शोधून देणाऱ्याला लाखांच बक्षीस जाहीर झालं आहे.

४. शिकवायचे विषय शाळेत परत आल्यामुळे शाळा बंद ठेवली आहे.

उत्तर: १. सत्य २. असत्य

३. सत्य ४. असत्य

## ब. माझा अभ्यास - शब्दसंपत्ती

**कृ.१. खालील शब्दांसाठी परिच्छेदात आलेले इंग्रजी शब्द सांगा.**

१. माणूस : [ ]

२. जमीन : [ ]

३. शुल्क : [ ]

४. नाही : [ ]

५. विचारणे : [ ]

**उत्तर:** १. मॅन  २. लॅण्ड

३. फी  ४. नो

५. आस्क

**कृ.२. खालील शब्दसमूहांना परिच्छेदातील इंग्रजी शब्द सांगा.**

१. माणसांची वस्ती व वावर नसलेले ठिकाण : [ ]

२. आपटून मागे येणे : ☐

**उत्तर:** १. नो मॅन्स लॅण्ड २. रिबॉण्ड

**कृ.३. गटात न बसणारा शब्द ओळखा.**

१. दादा, ताई, शाळा, गुरुजी

२. लेट, पत्ता, लॅण्ड, रिबॉण्ड

**उत्तर:** १. शाळा २. पत्ता

**कृ.४. खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगणारा योग्य पर्याय निवडा.**

तोंड वर करून बोलणे :

अ. वर पाहात बोलणे.

ब. बोलताना तोंड हलवणे.

क. उद्धटपणे बोलणे.

ड. तोंड लपवून बोलणे.

**उत्तर:** उद्धटपणे बोलणे.

**कृ.५. खाली दिलेल्या शब्दांपासून दोन अर्थपूर्ण शब्दांची रचना करा.**

१. रंग : ☐ ☐

२. विषय : ☐ ☐

**उत्तर:** १. रंगमंच, रंगलेपन

२. विषयनिहाय, विषयांतर

## क. माझा अभ्यास - व्याकरण

**कृ.१. दिलेल्या शब्दांचे परिच्छेदातील सामान्यरूप लिहा.**

१. शाळा        २. तिघे

३. गुरुजी

**उत्तर:** १. शाळे        २. तिघां

३. गुरुजीं

**कृ.२. अव्यय व अव्ययप्रकार यांच्या जोड्या जुळवा.**

| | अव्यय | | प्रकार |
|---|---|---|---|
| १. | छे! | अ. | शब्दयोगी अव्यय |
| २. | आणि | ब. | क्रियाविशेषण अव्यय |
| ३. | पास्नं | क. | केवलप्रयोगी अव्यय |
| ४. | तिथे | ड. | उभयान्वयी अव्यय |

**उत्तर:** (१ - क), (२ - ड), (३ - अ), (४ - ब)

**कृ.३. खालील वाक्यांचा काळ ओळखा.**

१. तिथे मला नवं काहीच शिकायला मिळत नव्हतं.

**उत्तर:** अपूर्ण भूतकाळ.

२. नंतर नीट झालं असेल सारं.

**उत्तर:** पूर्ण भविष्यकाळ

**कृ.४. कंसातील योग्य पर्याय निवडून वाक्यांचा प्रकार ओळखा.**

**(नकारार्थी, उद्गारार्थी, प्रश्नार्थी)**

१. शाळेत तुला काही शिकवलं की नाही?

**उत्तर:** प्रश्नार्थी

२. तिथे मला नवं काहीच शिकायला मिळत नव्हतं.

**उत्तर:** नकारार्थी

३. अरे! तो पाहा!

**उत्तर:** उद्गारार्थी

**कृ.५. खालील वाक्य लेखननियमांनुसार लिहा.**

या तीघांना पाहून तो चकीत होतो.

**उत्तर:** या **तिघांना** पाहून तो **चकित** होतो.

**कृ.६. पुढील विरामचिन्हांचा वापर असलेले परिच्छेदातील प्रत्येकी एक वाक्य शोधून लिहा.**

१. ? २. !

**उत्तर:** १. कोण आहेस तू?

२. छे! मला खूप दिवसापास्नं ही 'नो मॅन्स लॅण्ड' पाहायची होती.

## ड. माझे मत

**क्र.१. आजच्या शिक्षणपद्धतीबद्दल तुमचे मत सांगा.**

**उत्तर:** विद्यार्थ्यांची मानसिक, शारीरिक, बौद्धिक व सांस्कृतिक जडणघडण ही प्रामुख्याने त्यांच्या शालेय आयुष्यात घडत असते. अर्थातच शिक्षणपद्धतीचा त्यामागे फार मोठा वाटा असतो. पूर्वीची शिक्षणपद्धती केवळ पुस्तकी ज्ञानावर भर देताना दिसे; पण बदलत्या शिक्षणपद्धतीमुळे नृत्य, संगीत, खेळ, परदेशी भाषा इत्यादी गोष्टींचा समावेश अभ्यासक्रमात केला गेलेला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळतो व त्यांचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होते. आज प्रत्येक शाळांमधून काही सामाजिक उपक्रम राबवणे बंधनकारक केले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव होऊ लागली आहे. शैक्षणिक सहल, हाइकिंग, कॅम्प, बोधपर व्याख्याने, इंडस्ट्रिअल व्हिजिट यांमुळे मुलांचे व्यवहारज्ञान तसेच आत्मविश्वास वाढू लागला आहे. सर्व मूल्यांचा समावेश, कलागुणांना वाव अशा वातावरणामुळे विद्यार्थ्यांचे शिक्षण एकांगी न राहता त्यांच्या व्यक्तिमत्वाला पैलू पाडणारे ठरले.

## परिच्छेद ५


पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. ५१-५२ वरील (ओळ ८२ ते ११४) वाचा व खालील प्रश्नांची उत्तरे द्या.

|पण मग आता .......................

....................... गीत, संगीत,नृत्यचित्र|

### अ. आकलन

कृ.१. आकृतिबंध पूर्ण करा.





उत्तर: १. कार्ट अकाली प्रौढ झालंय.

२. सायकिॲट्रिस्टकडे न्यायला हवं.

३. याच्यावर फार खर्च करू नका. मतिमंदांच्या शाळेत घाला.

कृ.२. आकृतिबंध पूर्ण करा.





उत्तर: १. विविध कंपोझिशन्स

२. आलाप

३. पदन्यास

कृ.३. ओघतक्ता पूर्ण करा.




उत्तर: १. सूचक, आश्वासक गीत

२. संगीत

३. नृत्यचित्र

### कृ.४. चौकट पूर्ण करा.

१. शाळा बंद असताना, मुले हे पाहतात → [ ]

२. तिन्ही विषय हे हारासारखे गळ्यात मिरवायला तयार आहेत. → [ ]

**उत्तर:** १. लेटेस्ट वॉरच्या डीव्हीडीमधील व्हिडिओ

२. वेळापत्रकाचे गज

### कृ.५. योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.

१. ________ छानशी कानांवर.

अ. जिथे फक्त कविताच येईल

ब. जिथे फक्त कहाणीच येईल

क. जिथे फक्त विराणीच येईल

ड. जिथे फक्त शीळच येईल

२. अंड्यातून कोवळा पिवळा जीव यावा, तसा सूर्य ________

अ. माथ्यावर यावा.

ब. क्षितिजावर यावा.

क. डोंगराआडून यावा.

ड. आभाळात यावा.

उत्तर: १. **जिथे फक्त शीळच येईल** छानशी कानांवर.

२. अंड्यातून कोवळा पिवळा जीव यावा, तसा सूर्य **डोंगराआडून यावा.**

**कृ.६. विधाने सत्य की असत्य ते ओळखा.**

१. शाळा बंद असल्यामुळे मुले सतत मैदानी खेळ खेळतात.

२. मुलाला हिरव्या कुरणांवर रांगावेसे वाटते.

३. तो मुलगा अकाली प्रौढ झालेला आणि मतिमंद आहे.

४. संतुलित जीवन दर्शन घडवणारा भूगोल असेल, तर त्याचा इतिहास गौरवशाली राहील आणि नागरिकशास्त्र त्याचा पाईक बनेल.

उत्तर: १. असत्य २. सत्य

३. असत्य ४. सत्य

**कृ.७. प्रश्न तयार करा.**

१. 'चांदण्या' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

२. 'हिरव्या' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

उत्तर: १. रात्र कशाने भरून जावी असे मुलाला वाटते?

२. मुलाला कशा कुरणांवर रांगावेसे वाटते?

## ब. माझा अभ्यास - शब्दसंपत्ती

**कृ.१. परिच्छेदात आलेले इंग्रजी शब्द व त्यांचे अर्थ यांच्या योग्य जोड्या जुळवा.**

| | इंग्रजी शब्द | | अर्थ |
|---|---|---|---|
| १. | वॉर | अ. | बंदुकीची गोळी |
| २. | सायकिॲट्रिस्ट | ब. | युद्ध |
| ३. | बुलेट | क. | पलंग |
| ४. | बेड | ड. | मानसोपचारतज्ञ |

**उत्तर:** (१ - ब), (२ - ड), (३ - अ), (४ - क)

**कृ.२. खालील शब्दसमूहाबद्दल परिच्छेदातील इंग्रजी शब्द द्या.**

चाप ओढताच गोळ्यांच्या
सतत फैरी झाडणारी बंदूक : [ ]

**उत्तर:** मशीनगन

**कृ.३. गटात न बसणारा शब्द ओळखा.**

१. हिरव्या, कोवळा, सूर्य, मखमली

२. गीत, प्रेम, संगीत, नृत्यचित्र

**उत्तर:** १. सूर्य २. प्रेम

**कृ.४. वाक्प्रचाराचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.**

**पाईक होणे** : सेवकत्व स्वीकारणे.

**वाक्य:** गांधीजींचे विचार ऐकून अनेकजण त्यांचे **पाईक झाले**.

**कृ.५. दोन शब्दांतील रिकाम्या जागी एक शब्द भरून दोन अर्थपूर्ण शब्द तयार करा.**

१. खडी [ ] भात

२. मति [ ] गती

**उत्तर:** १. खडीसाखर, साखरभात

२. मतिमंद, मंदगती

## क. माझा अभ्यास - व्याकरण

**कृ.१. खालील नामांसाठी परिच्छेदात वापरलेली विशेषणे शोधून लिहा.**

| | |
|---|---|
| १. कुरण | २. जीव |
| ३. बटवा | ४. आभाळ |
| ५. रक्तवाहिन्या | ६. गीत |
| ७. भविष्य | ८. जीवन |

**उत्तर:**

| | |
|---|---|
| १. हिरवे | २. कोवळा / पिवळा |
| ३. मखमली | ४. छिन्नविच्छिन्न |
| ५. प्रदूषित | ६. सूचक / आश्वासक |
| ७. नवे | ८. छान / संतुलित |

**कृ.२. खालील शब्दांचे सामान्यरूप विभक्ती प्रत्यय व विभक्ती देऊन कोष्टक पूर्ण करा.**

| | शब्द | सामान्यरूप | विभक्ती प्रत्यय | विभक्ती |
|---|---|---|---|---|
| १. | स्वप्नात | | | |
| २. | चांदण्यांनी | | | |
| ३. | सृष्टीचे | | | |

**उत्तर:**

| | शब्द | सामान्यरूप | विभक्ती प्रत्यय | विभक्ती |
|---|---|---|---|---|
| १. | स्वप्नात | स्वप्ना | त | सप्तमी |
| २. | चांदण्यांनी | चांदण्यां | नी | तृतीया |
| ३. | सृष्टीचे | सृष्टी | चे | षष्ठी |

**कृ.३. वाक्यांतील अव्यय ओळखून त्यांचा प्रकार लिहा.**

१. परवाच डीव्हीडी आल्यात मार्केटमध्ये वॉरच्या, लेटेस्ट वॉरच्या.

**उत्तर:** परवाच - क्रियाविशेषण अव्यय

मार्केटमध्ये - शब्दयोगी अव्यय

२. शाळेत म्हणतात, याच्यावर फार खर्च करू नका किंवा मतिमंदांच्या शाळेत घाला.

**उत्तर:** याच्यावर - शब्दयोगी अव्यय

फार - क्रियाविशेषण अव्यय

किंवा - उभयान्वयी अव्यय

**कृ.४. खाली एका सामासिक शब्दाचा विग्रह करून देण्यात आलेला आहे. तसाच दुसरा सामासिक शब्द परिच्छेदातून शोधा व त्याचा विग्रह करून समासाचे नाव लिहा.**

**उदा:** कमलनयन - कमळासारखे नयन

**उत्तर:**

| सामासिक शब्द | विग्रह | समास |
|---|---|---|
| खडीसाखर | खड्यासारखी साखर | कर्मधारय समास |

**कृ.५. खालील वाक्यातील अलंकार ओळखा.**

प्रदूषित रक्तवाहिन्या रुग्णालयात वाळवशील?

पण जमिनीतले झरे कुठल्या बेडवर ठेवशील?

**उत्तर:** 'चेतनगुणोक्ती अलंकार'

**कृ.६. कंसातील सूचनेप्रमाणे खालील वाक्यांचे रूपांतर करा.**

१. आणि त्याचा पाईक होणं मला आवडेल.

**(प्रश्नार्थी करा.)**

**उत्तर:** आणि त्याचा पाईक होणं मला का नाही आवडणार?

२. छिन्नविच्छिन्न आभाळ कसे सांभाळशील?

**(विधानार्थी करा.)**

**उत्तर:** छिन्नविच्छिन्न आभाळ तुला सांभाळता येणार नाही.

**ड. माझे मत**

**कृ.१. भविष्याबद्दलची तुमची स्वप्ने सांगा.**

**उत्तर:** प्रत्येक विद्यार्थीच नाही, तर प्रत्येक माणूस आपल्या भविष्याविषयी स्वप्ने पाहत असतो. सध्याच्या काळात होणारी निसर्गाची हानी व त्यामुळे पशुपक्ष्यांचे होणारे हाल पाहून, मला भविष्यात या सगळ्यासाठी काहीतरी ठोस उपाय करावेसे वाटतात. उच्चशिक्षण घेऊन चरितार्थासाठी नोकरी करत असतानाच, पर्यावरण व पशुपक्षी संवर्धनासाठी सामाजिक संस्था उघडायचा माझा मानस आहे. माझ्या सामाजिक संस्थेमार्फत मी वृक्षतोड, जलप्रदूषण, वायुप्रदूषण यांसारख्या समस्यांबाबत जनजागृती करण्याचा प्रयत्न करेन. प्रदूषण टाळण्याचे आवाहन करेन. माझ्यासारखे समविचारी लोक जमवून स्वच्छता मोहीम, तसेच 'झाडे लावा-झाडे जगवा' असे प्रकल्प राबवेन. पशुपक्ष्यांसाठी खास परिसर निर्माण करेन. त्यांच्या संवर्धनासाठी विशेष प्रयत्नशील राहीन. पुढे जाऊन हिरव्या वनराईने नटलेल्या, समृद्ध भारताचे मी स्वप्न पाहात आहे.

## सारांश लेखन

**'विषय गेले पळून' हा पाठ लक्षपूर्वक वाचून पाठाच्या आशयाचा सारांश लिहा.**

'विषय गेले पळून' हा पाठ म्हणजे संजय पवार लिखित एकांकिका आहे. पडदा उघडताच एका निवेदनाने एकांकिकेची सुरुवात होते. त्या निवेदनातून शाळेतले काही विषय पळाल्याचे कळते. विषय हाती लागले असले, तरी इतिहास, भूगोल व नागरिकशास्त्र ह्यांचा तपास लागत नाही. तिन्ही विषय एका ठिकाणी थांबतात. त्यांच्यातील संवादातून माणसाने नैसर्गिक संपत्तीची केलेली हानी व कृत्रिम गोष्टींचा वाढता वापर या गोष्टींविषयीची खंत, राग जाणवतो. माणसातला प्रामाणिकपणा नष्ट होऊन तो सृष्टीला विनाशाकडे घेऊन चालल्याचे दुःख व्यक्त होते. त्याच ठिकाणी एका शाळकरी मुलाचे आगमन होते. शाळेला कंटाळलेल्या या मुलाकडून शाळेतल्या शिक्षणातला तोचतोपणा जाणवतो. निसर्गाशी, जीवनाशी नाते सांगणारे शिक्षण हवे असल्याची इच्छा जाणवते. एकांकिकेच्या शेवटी त्या मुलाने उभ्या केलेल्या स्वप्नदृश्यात इतिहास, भूगोल व नागरिकशास्त्र या विषयांनाही सहभागी व्हावेसे वाटते. अशा प्रकारे भावी पिढीकडून सकारात्मक बदलाची आशा या एकांकिकेच्या शेवटी व्यक्त होते.